सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन
संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

मासिक

# नवस्नेह



ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ९ वे : अंक ७
ऑक्टोबर २०२३

स्वागतमूल्य
₹. 30/-








प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

### कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने

# श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा

प्रतिवर्षाप्रमाणे कोल्हापूर चित्पावन संघातर्फे श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा शनिवार, दि. २१ ऑक्टोबर २०२३ रोजी ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, बिनखांबी गणेश मंदीरजवळ, श्री महालक्ष्मी मंदीर दक्षिण दरवाजा, कोल्हापूर येथे आयोजित केला आहे. यामध्ये पूजा, महाप्रसाद, श्री देवी मूर्ती प्रतिष्ठापना व दर्शन सायंकाळी ७ नंतर घागरी फुंकणे असा नियोजित कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यास पूजेसाठी येणाऱ्या वशेळ्यांनी दि. १९ सप्टेंबर, २०२३ पूर्वी नोंदणी करणे आवश्यक आहे. श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याच्या प्रसादासाठी येणाऱ्या भक्तांनी दि. १९ सप्टेंबर २०२३ पूर्वी नोंदणी करावी. वशेळ्यांनी सकाळी ठीक १० वाजता मंगलधाम सभागृहात येणेचे आहे. प्रसादाची वेळ दुपारी १२ ते ३ पर्यंतच आहे. भाविकांसाठी दर्शन वेळ सायंकाळी ७ ते रात्री ९ पर्यंतच ठेवली आहे. प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन प्रसंगानुरूप आवश्यक ते बदल होऊ शकतात. संबंधितांनी आधिक माहितीसाठी संघाच्या कार्यालयीन वेळेत ०२३१-२५४६२२५/२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५ या नंबरवर संपर्क करावा.

| **नंदकुमार मराठे** | **प्रसाद भिडे** |
|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष |

## श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याचे लाईव्ह प्रक्षेपण

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे मागील वर्षापासून नवीन उपक्रम सुरू केला आहे. अनेक भक्तांना केवळ प्रत्यक्ष दर्शन काही कारणांमुळे मिळत नाही. शिवाय आपले ज्ञाती बांधव केवळ भारतातच नाही, तर परदेशातही वास्तव्यास असतात. सर्व भक्तांना हा सोहळा घरी पाहता यावा यासाठी मागील वर्षापासून श्री अष्टमी सोहळ्याचे प्रक्षेपण सायंकाळी फेसबुकवरून लाईव्ह दाखविण्याची मोफत सोय केली आहे. संघाच्या फेसबुक पेजवरून हा सोहळा सर्व भक्तांना पाहता येणार आहे. जास्तीत जास्त भक्तांनी याचा लाभ घ्यावा व आपल्या प्रतिक्रिया नोंदवाव्यात.

## घरपोच प्रसाद योजना

स्थानिक किंवा परगावी असणाऱ्या भक्तांना घरपोच प्रसाद पाठवण्याची व्यवस्था संघाने केली आहे. यासाठी अभिषेक व प्रसाद दक्षिणा केवळ रु. ३५१/- संघाच्या अधिकृत कार्यालयात किंवा संघाच्या पत्त्यावर मनिऑर्डर किंवा बँक ट्रान्स्फर/ गुगल पे यापैकी कोणत्याही माध्यमातून पाठवावेत. नोंदणी फॉर्म आपल्याला व्हॉटस् ॲपवर पाठवला जाईल. त्यासाठी आपला व्हॉटस् ॲप नंबर संस्थेच्या ७६२०५४६२२५ या नंबर वर कळवावा. आपला संपूर्ण पत्ता व व्हॉटस् ॲप नंबर कळवल्यास आपल्याला घरपोच श्रींचा प्रसाद पाठवणे सोयीचे होईल. जास्तीत जास्त भाविकांनी या 'घरपोच प्रसाद योजनेचा' लाभ घ्यावा.

आपले स्नेहांकित,

| **हृषिकेश लिमये** | **सौ. संगिता आपटे** | **संतोष साने** | **केदार जोशी** |
|---|---|---|---|
| (संचालक) | (खजानिस) | (सहकार्यवाह) | (कार्यवाह) |
| ९४०४२६०४७० | ८१४९४८००३४ | ८४५९०१९०९१ | ७५८८८३९५२७ |

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ९ वे : अंक ७ : ऑक्टोबर २०२३**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) **संपादकीय** /४

२) **आम्ही कृष्णसख्या – 'कृष्णा'** /५
 – ज्योत्स्ना शिंत्रे

३) **चित्पावन संघ वार्षिक सभा वृत्तांत** / ८

४) **श्री परशुराम पतसंस्था वार्षिक सभा वृत्तात** /९

५) **विविध गुणगौरव व सत्कार समारंभ वृत्तांत** /१०

६) **मुलांचे पान** / १२

७) **ज्ञानसूर्याची सावली** /१४
 – सौ. मंजुश्री गोखले

८) **मुस्लिम स्त्री कलाकार** /१७
 – प्रकाश गानू

९) **कर्तुत्त्ववान महिला – इरावती कर्वे**
 – डॉ. केशव साठ्ये

१०) **म्हणींचे म्हणणे** /२० – वैदेही जोशी

११) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / २२

१२) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष) 0231-2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. १९ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

बाप्पा आले आणि समृद्धी देऊन गेले सुद्धा! आता त्यांच्या पाठोपाठ आपले स्वर्गस्थ पितर येतील, मग देवीची स्थापना, मग दसरा, मग दिवाळी! सणांची नुसती धामधूम आणि उत्साहाची धमाल! ती बघायला पाऊसही अधनंमधनं डोकावेलच. पण काही अपवाद सोडले तर एकंदरीत सगळीकडं उत्साहाचंच वातावरण! अर्थात नेहमीचे असंतुष्ट ते तसेच राहणार! असो.

**मुद्दई लाख बुरा चाहे**
**तो क्या होता है?**
**वही होता है जो**
**मंजुर ए खुदा होता है।**

हेच सत्य ! त्यामुळं आनंदात, उत्साहात राहूया! माझा आनंद आणि उत्साह वाढवणाऱ्या दोन महत्त्वाच्या घटना या पंधरा दिवसांत घडल्या. एक म्हणजे चित्पावन संघ, कोल्हापूर या संस्थेने त्यांच्या गुणगौरव कार्यक्रमात माझा अभूतपूर्व असा सत्कार केला, ज्याने मी भारावून गेले. ही आपल्या लोकांनी दिलेली शाबासकी माझा आनंद द्विगुणित करणारी ठरली आणि जबाबदारी सुद्धा! दुसरी घटना म्हणजे काही समाज कंटकांच्या त्रासाने 'समर्थ' या रामदास स्वामींच्या जीवनावर आधारीत कादंबरीचा रद्द केलेला प्रकाशन सोहळा धुळे येथील समर्थ वाग्देवेता मंदीर व गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे यांनी १४ तारखेला अत्यंत नीडरपणे साजरा केला. तुम्ही सगळे माझे सुहृद! तुमच्याशी शेअर करण्यानं आनंद आणखी वाढला. गुणगौरव सोहळाही अत्यंत देखणा झाला. अर्थात होणारच होता. कारण कौतुकानं केलेला तो कौतुक सोहळा होता. खरं ना?

मंडळी आपण चंद्रावर जाऊन पोहोचलो. आता सूर्याकडेही झेप घेतलीय. आपण हनुमानाचे वंशज आहोत हे सिद्धच होतंय.

**होगा चाँद किसी देश के झंडेमें।**
**मेरे देश का झंडा तो चाँदपर है।**

भारताच्या या प्रगतीला सलाम !

मित्रांनो आता पुढचा अंक दिवाळी अंक! तुमच्या दिवाळीच्या आनंदाला चार चांद लावणारा! अरे हो ! त्यासाठी साहित्य लवकर पाठवा बरं का. आम्ही प्रतिक्षेत आहोत. तुम्ही साहित्य लवकर पाठवलंत दिवाळी की अंक जास्तीत जास्त देखणा काढता येईल. होय ना? आता देवीचं स्वागत उत्साहाने, आनंदात करूया. ती नेहमीच आपल्या पाठीशी राहते. तेव्हा विजयादशमीच्या अनंत अनंत शुभेच्छा !

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# आम्ही कृष्णसख्या - कृष्णा

**(लेखांक नववा)**

**कृष्ण– व्यक्तिमत्व आणि तत्वज्ञान**

कृष्णसख्यासंबंधात आपण अगोदर आठ लेखांक वाचले. त्यापैकी पहिला लेखांक मी कृष्णावरच लिहिला होता. त्याचे कारण असे की, कृष्ण समजत नाही तोवर त्याच्या सख्या समजणार नाहीत. श्रीकृष्णाचे व्यक्तिमत्व हे वरवर पाहता फार गूढ होते, बऱ्याच परस्परविरोधी भावनांचे, कृत्यांचे मिश्रण कृष्णाच्या व्यक्तिमत्वात होते असे आपणाला जाणवते. खरे पण आपण खोलवर जाऊन विचार केला तर ते तसे विसंगतीने भरलेले नाही तर सुसंगतच आहे असे आपल्याला जाणवते. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे त्याच्या बालपणातली रासक्रीडा, गोपगोपियांसमवेत केलेली रासक्रीडा. त्याचे मुरलीवादन आणि त्याच्या मुरली वादनाने पशू, पक्षी, मानव यांची तुझ्या मुरलीने तहान भूक हरली रे, नको वाजवू श्रीहरी मुरली रे ! अशी झालेली अवस्था म्हणजे त्याची मुरली इतकी ऐकायला असह्य होती का? तर नाही. याचा वेगळा अर्थ आपल्याला खोल विचारांती जाणवतो. श्रीकृष्णाच्या मुरलीची हाक ऐकून सर्वजण अशा तऱ्हेने त्याच्याकडे ओढले जात होते की या भौतिक आयुष्यातील त्यांचे बांध तुटायला लागत.

कोणत्याही साधकाला जेव्हा परमेश्वराची ओढ लागते आणि त्याचवेळी जेव्हा त्याचे प्रापंचिक बांध हळूहळू तुटू लागतात, तेव्हा त्याच्या मनाची अशीच द्विधा अवस्था होत असते. एकीकडे देवाच्या मुरलीची फुंकर ऐकू येत असते तर दुसरीकडे भौतिक जग, त्यातील नातीगोती, कर्तव्ये, बंध सहजासहजी तुटत नाहीत आणि मग स्वाभाविकरीत्या मनाची अवस्था ही कविवर्य भा. रा. तांबे यांच्या काव्याप्रमाणे होते,

**कळा ज्या लागल्या जीवा**
**मला की ईश्वरा ठाव्या**
**कुणाला काय हो त्यांचे**
**कुणाला काय सांगाव्या**
**नदी लंघून जे गेले**
**तयांची हाक ये कानी**
**इथे हे ओढिती मागे**
**मला बांधून पाशांनी !**

कवींनी हे लिहिताना मरणाच्या जाणीवेसंदर्भात लिहिले असले तरी परमेश्वराच्या हाकेला सुद्धा ही मनस्थिति चपखल बसते. म्हणून मी गाण्याचा संदर्भ दिला आहे. संत मीराबाई यांच्यासुद्धा अनेक कवनातून या प्रकारची भावना व्यक्त झालेली आहे, हे मीरेवरच्या लेखात वाचकांनी वाचलेलंच आहे.

तर अशी ही त्याची रासक्रीडेचे आवाहन करणारी मुरलीची हाक म्हणजे आपण समजतो तसे बासरी वादन नव्हते; तर ते परमेश्वराने भक्ताला दिलेले आवाहन होते. मी तुझ्यासाठी इथे कदंब – वृक्षाखाली ताटकळत उभा आहे, तुला हाक देतो आहे, तर तू आता विलंब न करता माझ्याकडे प्रस्थान ठेव, अशी देवाने भक्तांची केलेली आळवणी आहे. सर्वसाधारणत: कुण्या एकाने शंकराची तपश्चर्या केली, कुणी विष्णूची तपश्चर्या केली, कुणी ब्रम्हदेवाची केली असे आपण खूप ठिकाणी वाचतो. पण इतर कुठल्याही देवाने भक्ताला हाक घातली आहे, देवानेच भक्ताला आवाहन केले आहे; असे एकतरी उदाहरण आपल्याला माहिती आहे का? हा होता कृष्ण!

नंतर पुढे कृष्ण गोकुळातून मथुरेला गेला. तोपर्यंत त्याने समस्त गोकुळाला आपल्या नादी लावलेच होते. मग त्यांना वाऱ्यावर सोडून, त्यांचे मन मोडून तो गेला का? तर नाही. त्याच्या भक्तांची मोक्षाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच तो गेला. सर्व गोप–गोपिकांना स्वरूपाची ओळख पटेपर्यंत तो गोकुळातच राहिला.

पण श्रीकृष्णाचे मानव जन्मातील कार्य यापेक्षा खूपच मोठे आणि विस्तृत होते. त्याने स्वतःच भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे 'धर्मसंस्थापनार्थाय' पृथ्वीतलावर अवतार घेतला होता. हे जे ध्येय होतं त्यासाठी 'विनाशयचदुष्कृतांम' हे करणंच भाग होतं. तेव्हाच त्याचं दुसरं इप्सित– 'परित्राणाय साधूनां' हे गाठता आलं असतं. म्हणून त्याला गोकुळच्या लहान घेऱ्यातून उघड्या, अपरिमित जगात जाणं भाग होतं. त्याने तसंच केलं आणि त्यादृष्टीने त्याने पहिलं पाऊल मथुरेत टाकले. तिथे त्याने कंस–चाणूर–कुवलय यांना मारून त्याच्या ध्येयाकडे जाणारे पहिले पाऊल टाकले आणि आपले वैश्विक ध्येय गाठण्यासाठीची वाटचाल

सुरू केली.

ह्या वेळेस कृष्णाचे वय खूपच लहान असल्याने आणि त्याने मानव जन्म घेतला असल्याने त्याला शारीरिक मर्यादा होत्याच; पण त्याच्या पारमार्थिक शक्तीला अर्थातच मर्यादा नव्हती. त्यामुळेच त्याने कंसाची दासी कुब्जा हिला स्वतःकडे वळवून घेतले आणि तिचे रूपांतर एका अनन्य भक्तात करून टाकले. ती अष्टवक्रा स्त्री कधी सुंदरीत रूपांतरित झाली हे तिचं तिलाच कळलं नाही. तिच्याबद्दल आपण 'कुब्जा' या लेखात वाचलेच आहे.

कृष्णाचा मूळ हेतू हा माणूस नष्ट न करता, माणसाला न मारता त्याच्यातल्या दुष्टाव्याला, हीनाला मारणं हा होता. पण जिथे जिथे माणूस आणि त्याचे वाईट वर्तन हे एकच झाले होते आणि वेगळे करणे शक्य नव्हते त्या ठिकाणी त्याने त्या त्या माणसांना देखील मारले– जसे की कंस.

यावरून कुणाला असे वाटेल की कृष्ण हा फारच कठीण हृदयाचा होता. आपले ध्येय गाठण्यासाठी कुठल्याही स्तरावर जाणारा होता. पण ही कल्पना चुकीची ठरेल. कारण नाती जपण्यामध्ये, दिलेले वचन पाळण्यामध्ये कृष्णाचा हात धरणारा कोणीच नाही. द्रौपदीला, मानलेल्या बहिणीला पुरवलेली वस्त्रे– तिची लाज राखण्यासाठी किंवा शिशुपालाचे माफ केलेले नव्व्याणव अपराध, स्वतःच्या आत्याला दिलेले वचन पाळण्यासाठी.

भक्तांशी जन्मजन्मांतरीचे नाते जपण्यासाठी कृष्णाने कुठल्या मर्यादेपर्यंत त्याग केला याचे उत्तम उदाहरण आपल्याला 'वृंदा' या लेखात सापडले. वृंदा या कृष्णसखीच्या डोळ्यावर आलेले मोहमायेचे, वैभवाचे, पतिप्रेमाचे भ्रामक पटल दूर करून तिला खऱ्या भगवत प्रेमाकडे वळवण्यासाठी त्याने स्वतःच्या शीलाचा देखील त्याग केला. तिच्या पतीचे रूप घेऊन, तिच्याशी संग केला. त्यासाठी तिचा क्रोध, शाप सहन केला. शाळीग्राम होऊन पडला परंतु तिची साथ सोडली नाही. तिला स्वतःकडे वळवून घेऊनच स्वस्थ झाला.

कृष्णाचे एकूणच आयुष्य आपण पाहिले तर वरवर पाहता सर्व भोग घेऊनही त्याग हाच त्याच्या आयुष्याचा पाया दिसतो. त्याला जन्मल्यापासून किती प्रकारचा त्याग करावा लागला याचा विचार केल्यास आपल्याला या विधानाची प्रचिती येते. पण प्रत्येक वेळेच्या त्यागामध्ये त्याचा ठसा त्याने उमटवला होता.

जन्मताक्षणी स्वतःच्या आईचा त्याग करून त्याला गोकुळात जाऊन आश्रय घ्यावा लागला, यशोदेला मातेचे स्थान मिळाले पण तो यशोदेच्या मायेत गुंतून राहिला का? तर नाही. तिलाही वेळ येताच सोडून तो मथुरेत आला, स्वतःचे परमध्येय गाठण्यासाठी. पण आजही आपल्या मनात यशोदा मातेचे स्थान अबाधित आहे. आई–मुलाची जोडी म्हणजे कृष्ण–यशोदा. देवकीने जरी त्याला जन्म दिला असला आणि पुढची अनेक वर्षे जरी तो देवकीसमवेत राहिला तरी कृष्णाची आई यशोदा हे समीकरण जनमानसातून पुसले गेलेले नाही.

हीच कथा राधेची. कुणी म्हणतात कृष्ण गोकुळात

## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे सभासद संपर्क अभियान

आपले संघाचे जवळपास १०२० आजीव सभासद आहेत. सुमारे ५८ वर्षांपासूनचे सभासद नोंदणी अर्ज संस्थेकडे उपलब्ध आहेत. पण कालानुरूप बदल झाल्याने त्यात अनेक संदर्भ, माहिती आवश्यक आहे. जेणे करून संघाला पुढील २५ वर्षांचे नियोजन करणे शक्य होईल. तसेच अनेक सभासद नोंदणी अर्ज जीर्ण झाल्याने त्याचे संकलन अवघड झाले होते पण, आपले हितचिंतक, मार्गदर्शक **श्री. प्रसाद खाडिलकर** यांनी त्याची जबाबदारी घेऊन ते अमेरिकेला गेले असता सर्व अर्जातील माहिती अद्ययावत सॉफ्टवेअरमध्ये पूर्णपणे भरून संस्थेला सर्व सभासद यादी परिपूर्ण करून दिली आहे. **हे सॉफ्टवेअर श्री. प्रसाद खाडिलकर यांनी संस्थेला विनामोबदला तयार करून दिले आहे, त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघ त्यांचे सदैव ऋणी राहील.** ही सभासद यादी अद्ययावत करण्यासाठी आपण संघाचे कार्यालयात आपली माहिती आमचे प्रतिनिधींना देऊन सहकार्य करावे. नवी अद्यावत सभासद यादी तयार होण्यासाठी हे आपले सहकार्य अपेक्षित आहे.

**– अध्यक्ष**

आला तेव्हा राधा विवाहितच होती, कुणी म्हणतात की राधा – कृष्ण समवयस्क होते. पण जी काय सत्यकथा असेल ती असो, पण राधेचे नाव कायमच कृष्णाशी जोडले गेले. भक्ताला देवापेक्षा महत्व मिळाले. तिची श्रेष्ठ भक्ती या निमित्ताने जपली गेली. पण एकदा तिला पूर्णपणे भक्तीमार्गावर आणल्यानंतर कृष्ण तिला भेटायला पुन्हा कधीही गेला नाही. देव भक्तांचे नाते इतके अभिन्न झाले होते की पुन्हा वळून पहायची गरजच पडली नाही.

पुढे मथुरेतून द्वारकेला जाण्याचा इतिहास पाहिला तरी हीच गोष्ट प्रत्ययाला येते. मथुरेवर सतत होणाऱ्या जरासंधाच्या स्वाऱ्या टाळण्यासाठी त्याने मथुरेचा त्याग केला आणि द्वारकेला नवे शहर बसवले.

भारतद्वीपाच्या पूर्णपणे पश्चिमेला असलेले द्वारका एक बेट होते– आहे. संपूर्ण भारत ओलांडून जरासंध तिथपर्यंत येऊ शकणार नाही हे ओळखून त्याने हा निर्णय घेतला. अचूक निर्णय हे कृष्णाचे एक वैशिष्ट्य होते. कारण जरासंधाची ताकद ओळखून त्यानेच बाहेर पडणे आणि दुसरीकडे निघून जाणे आणि कुलनाश टाळणे हा निर्णय किती योग्य होता हे पुढे द्वारकेच्या झालेल्या भरभराटीवरून कळतेच.

हे झाले थोडे विषयांतर. आपण पुन्हा आपल्या मूळ विषयाकडे वळूया. आपल्या कृष्णसख्यांकडे वळूया. मीराबाईबद्दल आपण आधीच्या लेखात वाचलेच आहे. तिचे कृष्णाने कसे नेहेमीच रक्षण केले हे आपण पाहिलेच. भक्ताचा आत्मा कितीही परमेश्वराच्या जवळ असला तरीही त्या आत्म्याला भगवत भक्ती करण्यासाठी शरीराची गरज असते. त्यामुळे भक्ताच्या शरीराचे रक्षण करणे हे भगवंताला भाग आहे, हेच कृष्णाने दोन वेळा मीराबाईला वाचवून दाखवून दिले आणि संसारपाशातून मुक्त केले.

'आण्डाल' या स्त्रीभक्ताच्याबाबत तर खूपच लहान वयापासून तिचा ओढा भक्तीकडेच होता. मीराच्या घरचे वातावरण भगवंतभक्तीला मारक होते पण आण्डाल ही भक्तपरायण कुटुंबातच वाढली होती. परंतु कर्मकांडाच्या पगड्यात हरवलेला, तिच्या वडिलांचा मूळ गाभा, कृष्णाने दृष्टांत देऊन जागवला आणि दोघांचाही आपल्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग खुला करून दिला.

कर्माबाई ही वेगळीच स्त्री भक्त– कृष्णसखी म्हणता येईल. हिची भक्ती मातृभावाची आहे. म्हणून कृष्णानेही तिची भक्ती बालक होऊनच स्वीकारली.

कृष्णाची ही वेगवेगळी रूपे पाहून त्याच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आपण अचंबित होऊन जातो. एकीकडे आपल्या भक्तांबद्दल अतिशय मृदु, कोवळ्या मनाचा कृष्ण, दुसरीकडे अर्जुनाला युद्धाला उद्युक्त करताना कसा कर्तव्य कठोर होतो हे आपल्याला माहीतच आहे.

युद्धाच्या शेवटच्या दिवशी कृष्णाने अर्जुनाला स्वतःच्या आधी रथातून उतरायला सांगितले. रथातून अर्जुन उतरल्यावर कृष्णाने आधी घोडे मोकळे केले आणि मगच तो रथातून उतरून अर्जुनाला बरोबर घेऊन रथापासून वेगाने दूर जाऊ लागला. काही क्षणातच रथ धडाडून पेटला आणि नष्ट झाला. त्याचे स्पष्टीकरण देतानासुद्धा कृष्णाने एक वैश्विक सत्य सांगितले

**आत्मानंरथि नं विद्धि, शरीरंरथमेवतु !**

**बुद्धी तू सारथी विद्धी, मन प्रगहमेवच !**

शरीर म्हणजे रथ जोपर्यंत आत्मा म्हणजे कृष्णचैतन्य या रथावर आरूढ आहे, सारथीरुपी बुद्धी शाबूत आहे आणि बुद्धीने मनरूपी लगाम पकडले आहेत, तोवरच देहात प्राण नांदत आहेत, सुरक्षितता आहे. ज्याक्षणी जीवात्मा हा रथ सोडतो, त्याक्षणी शरीराचे कलेवर होते, जे फक्त जळून जाण्यायोग्य असते. हेच ते वैश्विक सत्य.

असा हा कृष्ण. याचे संपूर्ण जीवन डोळसपणे समजून घेतले तो मुक्त झाला. त्यामुळेच कृष्णाच्या जीवनाचे सार म्हणजेच मुक्ती. सर्व आयुष्यभर कृष्ण निर्लेपच राहिला. तो कमलपत्रासारखा होता. संपूर्ण आयुष्य ऐश्वर्य भोगून निर्लेप, कोरडा राहिलेला कृष्ण ज्याला समजला तो मोक्षपदी सहजच पोहोचू शकला.

अगोदरच्या लेखांमध्ये उल्लेख केलेल्या सर्व कृष्णसख्या यांनी कृष्णाला खरोखर समजून घेतले. त्याच्या तत्वज्ञानाशी त्या एकरूप झाल्या. त्याच्या इच्छेने जगल्या आणि त्याच्यामध्येच विलीन झाल्या. म्हणूनच त्यांना कृष्णसख्या हे नाव अगदी योग्यच आहे.

अशा या कृष्णसख्याना वंदन करून आपण ही लेखमाला येथे संपवूया.

– **सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,** मोबा. ९९२००५८७०५

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# कोल्हापूर चित्पावन संघाची
# ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत उत्साहात संपन्न




हीरकमहोत्सवाच्या उंबरठ्यावर असलेली कोल्हापूर चित्पावन संघाची ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १० सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ११.३० वा ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम येथे सुरू झाली. सुरवातीला अहवाल सालातील निधन पावलेले आजीव सभासद, त्यांचे नातेवाईक, देशातील मान्यवर यांच्यासाठी दोन मिनिटं स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहिली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सभा सुरू झाली. आपल्या अध्यक्षीय स्वागतपर मनोगतामध्ये श्री. नंदकुमार मराठे म्हणाले, 'संघाच्या स्थापनेपासून स्व. कोल्हटकर, स्व. राजाभाऊ करंदीकर, स्व. भाऊसाहेब गोखले, स्व. द. गो. कानिटकर, स्व. बाबा अभ्यंकर यांनी अथक परिश्रम घेतल्यामुळेच आज करवीर नगरीत आपला संघ मोठ्ठ्या दिमाखाने हीरक महोत्सवाच्या उंबरठ्यावर आहे. आजपासून आपल्या संघाचे हीरकमहोत्सवी वर्ष सुरू झाले आहे असे मी अधिकृत जाहीर करतो.' यानंतर संघाचे सचिव श्री. केदार जोशी यांनी नोटिसीचे वाचन केले व विषयवार सर्व मुद्दे वाचून सविस्तर व समाधानकारक उत्तरे देऊन उपस्थित सभासदांकडून सर्व विषय सर्वानुमते मंजूर करून घेतले. सुवर्ण चतुष्कोन निधी संदर्भात संघाचे उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांनी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, 'या निधीमध्ये भर पडत आहे. आपल्या संघातर्फे गरजुंना पदव्युत्तर शिक्षणासाठी अर्थिक मदत दिली जाते. याची परतफेडही आपले बांधव करत आहेत. या हीरक महोत्सवाच्या निमित्ताने चतुष्कोन निधी एक कोटी पर्यंत नेण्याचा संकल्प करत आहोत. तरी आपल्या ज्ञाती बांधवांनी या निधीमध्ये देणगी देऊन लवकरात लवकर संकल्पपूर्ती करावी असे मी सर्व संचालक मंडळाच्या वतीने जाहीर आवाहन करत आहे. तसेच अहवाल सालात संघाने अनेक सामाजिक उपक्रम केले. यामध्ये प्रामुख्याने स्वातंत्र्य दिनानिमित्त ३०१ झेंडे वितरण, पुरग्रस्ताना सहकार्य, खेडेगावातील शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप व सायकल वाटप, सुप्रसिध्द गायक श्रीधर फडके यांचा 'बाबुजी आणि मी' हा संगीत कार्यक्रम, मराठी दिनदर्शिकेचे मोफत वितरण असे अनेक सामाजिक उपक्रम यशस्वी केले आहेत'. यानंतर आभार प्रदर्शनात संघाचे संचालक श्री. मकरंद करंदीकर यांनी चित्पावन संघ व संघाचीच रौप्यमहोत्सवी श्री परशुराम पत संस्था या दोन्ही संस्थांचे सभासद, कार्यालयीन सहकारी, मंगलधाम व त्यांचे सहकारी यांचे आभार मानले. संघाला अधिक अर्थिकदृष्ट्या भक्कम करावे. संघाच्या विविध उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहनही केले. यानंतर श्री प्रशांत करंदीकर यांचे पसायदान झाल्यावर सभा अत्यंत उत्साहात व खेळीमेळीत संपन्न झाली.

# रौप्यमहोत्सवी श्री परशुराम पतसंस्थेचा सभासदांना १२% लाभांश जाहीर



रौप्यमहोत्सवी श्री परशुराम पतसंस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १० सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १०.३० वा. ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम येथे सुरू झाली. सभेला आवश्यक योग्य ती गणपूर्ती झाल्यावर अहवाल सालातील निधन पावलेले सभासद, त्यांचे नातेवाईक, देशातील मान्यवर यांच्यासाठी दोन मिनिटं स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहिली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन झाले. संस्थेचे अध्यक्ष श्री. मुकुंद गोरे यांनी सभासदांचे व सर्व हितचिंतकांचे स्वागत केले व या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त जादा ७ टक्के व नेहमीचा ६ टक्के असा एकूण १३ टक्के लाभांश जाहीर केला. यावर उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या गजरात याचे स्वागत केले. संस्थेचे उपाध्यक्ष श्री. माधव करंदीकर यांनी सभेची नोटीस वाचून दाखवली व नोटिसीप्रमाणे सर्व विषय मंजूर करून घेतले. संस्थेचे हितचिंतक व ज्येष्ठ सभासद सीए. श्री. विकास परांजपे यांनी संस्था २६व्या वर्षात पदार्पण करत आहे यानिमित्त सर्वांचे अभिनंदन केले. संस्थेचा आर्थिक विकास अजुनही उत्तम चालण्यासाठी व विविध उपक्रम राबवण्यासाठी कायम निमंत्रित विशेष सल्लागारांची नियुक्ती करून घेऊन संस्थेचे कामकाज करावे तसेच कोल्हापूर चित्पावन संघ व श्री परशुराम पतसंस्था या दोन्ही संस्थाच्या वतीने एक समन्वय समिती स्थापन करावी या समितीने दरमहा बैठक घेऊन संस्थेला सर्वोतोपरी सहकार्य करावे असा सल्ला दिला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. मुकुंद गोरे यांनी श्री. संतोष साने व श्री. श्रीकांत लिमये यांना कायम निमंत्रित विशेष सल्लागार म्हणून घेत आहोत तसेच संस्थेच्या उत्कर्षासाठी समन्वय समितीही स्थापन करूया असे जाहीर केले. तसेच संस्थेचे निवृत्त संचालक श्री. गिरीष जोग व श्रीमती मंदा मराठे यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अहवाल सालात संस्थेची निवडणूक बिनविरोध केल्याबद्दल नूतन संचालक सर्व सभासदांचे, विशेष करून कोल्हापूर चित्पावन संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे, उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे, संचालक श्री. मकरंद करंदीकर सर्व पदाधिकारी व संघाचे संचालक हितचिंतक व सभासद यांचे मनापासून आभार व्यक्त केले. आपली पतसंस्था ही कोल्हापूर चित्पावन संघानेच लावेलेले रोपटे आहे या रोपट्याला जपण्याचे व वाढवण्याचे कार्य सुरवातीच्या काळात स्व. पी. आर जोशी, डॉ. गणपुले, श्री. केशव भावेकाका व नंतरच्या काळात स्व. द. गो. कानिटकर यांनी अथक प्रयत्न केले. संस्थेला ‘ब’ वर्ग प्रमाणपत्र मिळाले आहे. परंतु पुढील वर्षी अ वर्ग मिळेल याबद्दल नक्की प्रयत्न करू असे श्री. मुकुंद गोरे यांनी आपल्या मनोगतात

सांगितले. संस्थेचे संचालक ॲड. महेश जोशी यांनी संस्थेतील कर्जाबाबत व इतर अर्थिक कामकाजाबाबत माहिती दिली. संस्थेच्या सचिव सौ. खाडीलकर यांनी थकित कर्जदार, ठेवीदार, याबाबत सविस्तर माहिती दिली. उपस्थित सभासदांनी संस्थेच्या संचालक मंडळावर विश्वास ठेवावा, थकित कर्जे लवकरात लवकर वसूल करून संस्थेला उर्जित अवस्थेत न्यावे तसेच श्री परशुराम पतसंस्थेची मातृसंस्था असलेल्या कोल्हापूर चित्पावन संघाचे संचालक, सल्लागार यांच्याकडून कोणतेही सहकार्य लागल्यास सर्वोतोपरी सहकार्य करू असे आश्वासन संस्थेचे सभासद श्री. प्रसाद भिडे यांनी दिले. श्री. नंदकुमार मराठे यांनी सभासदांतर्फे पतसंस्थेचे संचालक व सल्लागार मंडळाचे सदस्य तसेच संस्थेचे कर्मचारी यांच्या अभिनंदनाचा ठराव केला व वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न झाली.

# कोल्हापूर चित्पावन संघातर्फे विविध गुणगौरव व सत्कार समारंभ सोहळा




हीरकमहोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव व विविध सत्कार समारंभ शनिवार, दि. ९ सप्टेंबर २०२३ रोजी ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम येथे संपन्न झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे, उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे, कार्यवाह श्री. केदार जोशी व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन करण्यात आले. गेल्या दोन वर्षात कारोनाच्या काळामुळे प्रलंबित असलेला सोहळा आज संपन्न होत आहे असे श्री. नंदकुमार मराठे यांनी स्वागतपर मनोगतात सांगितले. आपल्या ज्ञाती समाजातील लहान मुलांपासून ते उच्च पदवीधर व विविध क्षेत्रात लक्षणीय यश संपादन केलेल्यांचे कौतुक या सोहळ्यामधे होत आहे. या सोहळ्यात पुढील मान्यवरांना मानपत्र, शाल, श्रीफळ, भगवान श्री परशुरामांची मूर्ती व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये वैदिक क्षेत्रातील वे. शा. सं. श्री. मुकुंद केळकर, आदर्श माता सौ. उज्ज्वला चिपळूणकर, पत्रकार ओंकार धर्माधिकारी, सौ. अश्विनी टेंबे-दफ्तरदार, सामाजिक कार्यकर्ते श्री धनंजय नामजोशी, डॉ. राधिका जोशी, रक्तदाते श्री. राहूल गोखले व प्रभाकर सोहनी, तसेच संघाच्या वाटचालीत सातत्याने मोलाचे सहकार्य करून सिंहाचा वाटा उचलणारे सीए. श्री. विकास परांजपे, नागेशराव दांडेकर, सतीश पाध्ये, पुष्पा सोहनी, श्री. प्रसाद खाडिलकर, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांचा पुस्तकासाठी सर्वोत्कृष्ट इतिहास पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री. गुरुप्रसाद कानिटकर, तसेच नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांचा प्रामुख्याने समावेश होता. यानंतर पहिली ते पदव्यूत्तर यामध्ये विशेष गुण संपन्न केलेल्या व विविध क्रीडा, मनोरंजन व विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या जवळपास पन्नास विद्यार्थ्यांचे प्रशस्तीपत्रक, रोख रक्कम व वह्या देऊन मान्यवरांच्या हस्ते कौतुक

करण्यात आले. यावेळी संघाचे उपाध्यक्ष श्री. भिडे यांनी, संघाच्या वतीने चतुष्कोन निधीचा योग्य वापर होत आहे. यामुळे आपल्या ज्ञाती समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळत आहे. असे सहकार्य घेणारे पालकही शिक्षण पूर्ण झाल्यावर घेतलेली रक्कम परत करतातच पण याही पलिकडे जाऊन त्यात भर घालून देणगीही देतात हे लक्षणीय व कौतुकास्पद आहे याचा उल्लेख केला. संघाला देणारी देणगी आयकरात ८०जी मार्फत सवलतीस पात्र आहे याचा देणगीदारांनी लाभ घ्यावा व जास्तीत जास्त देणगी देऊन आपल्या ज्ञाती समाजातील पाल्यांच्या भविष्यास व भवितव्यास मोठा आर्थिक हातभार लावावा असे प्रेमळ आवाहनही केले. या सोहळ्यातच संघाचे संचालक श्रीकांत लिमये यांनी त्यांचे पिताश्री सिनेस्टार स्व. अनंत लिमये नकलाकार यांच्या स्मरणार्थ, श्रीमती शामला अनंत लिमये यांच्याकडून प्रतिवर्षी ज्ञाती समाजातील उभरता कलाकार किंवा कला क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्याला 'अभिनय पुरस्काराने' सन्मानित करण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व यासाठी लिमये परिवारातर्फे रु.११,०००/- चा धनादेश सौ. श्रुती श्रीकांत लिमये यांनी संघाच्या पदाधिकाऱ्यांकडे दिला. या सोहळ्याचे सूत्रसंचालन सुप्रसिध्द आरजे श्री. मनिष आपटे यांनी केले. मानपत्राचे वाचन सौ. पल्लवी देशमुख व सौ. बेहेरे यांनी केले. आभार प्रदर्शनाची औपचारीकता संस्थेचे संचालक श्री. मकरंद करंदीकर यांनी पूर्ण केली. संस्थेची शिक्षण व गुणगौरव समिती, संघाचे सहकारी वर्ग, संचालक मंडळ विविध विषयांसाठी देणगी देणारे देणगीदार, मंगलधामचे संचालक व सहकारी वर्ग श्री परशुराम पतसंस्थेचे सर्व संचालक व सहाकारी व उपस्थित असलेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे मनापासून ऋण व्यक्त केले व सौ. पल्लवी देशमुख यांच्या पसायदानाने या सोहळ्याची सांगता झाली.


## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**

**श्री. रोहित गवळी – 9657963475**

## समर्थ कादंबरीचा प्रकाश समारंभ




धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिर, सत्कार्योत्तेजक सभा आणि गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. मंजुश्री गोखले यांनी लिहिलेल्या समर्थ रामदासांवरील 'समर्थ' या कादंबरीचा प्रकाशन समारंभ गुरुवार, दि. १४ सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजता स्वामीकृपा सभागृह, कर्वे रोड, पुणे येथे संत साहित्याचे गाढे व्यासंगी डॉ. अशोक कामत आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांनी ही कादंबरी प्रकाशित केली आहे.

# मुलांचे पान



## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक अठ्ठाविसावा)

त्या दिवशी माध्यान्ह उलटून गेली आणि द्वारकामाई कावेरीअक्कांना घेऊन या भावंडांच्या घरी आली. मुलांची जेवणं झाली होती. तीन भावांनी आणलेल्या माधुकरीच्या झोळ्यांतून ओलं, शिजवलेलं अन्न मुक्तानं वेगळं केलं होतं आणि ते चौघांनी खाऊन घेतलं. त्यात द्वारकामाईंचा आंबलेला भातही होता. तो भात बघितल्यावर सोपानानं झाली गोष्ट निवृत्ती-ज्ञानेशाला सांगितली. तोच मुक्ती म्हणाली, ''दादा, हा भात आंबलेला आहे. तो खाऊ या नको.'' मुक्ती पुढे काही बोलणार तोच ज्ञानेशानं हातानेच तिला थांबवलं. त्यानं सोपानाला विचारलं, ''सोपाना, तुझं काय म्हणणं आहे?'' सोपानानं एक कटाक्ष त्या भाताकडे टाकला. म्हणाला, ''दादा, भात आंबलेला जरूर आहे; पण माईंची माया तर साखरेसारखी गोड आहे ! आणि त्यांनी मुद्दाम हा असा भात मला वाढला नाही. ते चुकून झालं ! आणि त्यापायी त्यांना खूपच वाईट वाटलंय ! तेव्हा मला वाटतं, हा भात आपण खावा !'' सोपानाचं बोलणं ऐकून मुक्ता म्हणाली, ''अरे पण दादा, यामुळे पोटाला अपाय होईल ना? त्याचं काय?'' तिच्या या प्रश्नाचं उत्तर पुन्हा सोपानानंच दिलं, ''मुक्ते, अगं दगड पचविण्याची ताकद आपल्यात आली पाहिजे. भाताचं काय घेऊन बसलीस? आणि शिवाय गरजवंतानं चोखंदळ असू नये. त्याला निवडीचं स्वातंत्र्य नसतं !'' हा संवाद मिटण्याची चिन्हं काही दिसेनात. शेवटी निवृत्तीनं यात हस्तक्षेप केला अन् म्हणाला, ''इथं मुक्ते तुझं आणि सोपाना तुझं दोघांचंही बरोबर आहे. म्हणून मी एक सुवर्णमध्य काढतो. आपण हा भात सगळा खाऊ या नको ! म्हणजे कोणाच्याच पोटाला त्रास होणार नाही. आणि आपण यातला एकेक घास खाऊ या, म्हणजे त्या अन्नाला आणि माईंच्या मायेलाही न्याय दिल्यासारखं होईल.'' निवृत्तीनं काढलेला सुवर्णमध्य सगळ्यांनाच पटला आणि त्वरित त्याची अंमलबजावणी झाली. त्या आंबलेल्या भातातला एकेक घास सगळ्यांनी खाल्ला आणि सगळ्यांनी त्या भाताला नमस्कार करून तो भात बाजूला ठेवला. त्यानंतरची त्यांची जेवणं मात्र छान हसत-खेळत झाली.

जेवणं झाल्यावर सोपानानं पत्रावळी गोळा केल्या आणि पाटीत ठेवल्या. मुक्तीनं शेणगोळा फिरवला. निवृत्ती-ज्ञानेशाला मुक्तीचं कौतुक वाटलं. कावेरीअक्कांसोबत राहून ती खूप शहाणी, समंजस झाली होती. थोडाफार स्वयंपाक करायलाही शिकली होती. कावेरीअक्का नेहमी म्हणायच्या, ''मुक्ता एकपाठी आहे. जे शिकवलंय ते लगेच आत्मसात करते. दुसऱ्यांदा पुन्हा तिला सांगावं लागत नाही हो ! पोर मोठी हुशार आहे !'' त्यांनी केलेलं हे कवतिक मुक्ती सार्थ करून दाखवायची. तिची कामातली नीटसता, तिचा कामाचा उरक, याबद्दल ज्ञानेश्वर काहीतरी बोलणार, तोच, ''मुक्तेऽऽ ए मुक्ता बाऽ'' अशा हाका मारत कावेरीअक्काच आल्या आणि आश्चर्य म्हणजे त्यांच्याबरोबर द्वारकामाई होत्या. त्यांना बघून सोपान उभा राहिला. आश्चर्यानं म्हणाला, ''माईऽ तुम्ही? आणि इथे?'' सोपानाचं बोलणं ऐकून निवृत्ती-ज्ञानेश्वर पुढे आले. हात जोडून निवृत्ती म्हणाला, ''माई, आपण इथं येण्याची तसदी का घेतलीत? आम्हाला निरोप धाडायचा. आम्ही आलो असतो.'' माई काही उत्तर देणार तोच ज्ञानेश्वर म्हणाला, ''माई, आपलं इथं येणं आम्हाला अगदीच अनपेक्षित आहे; पण आपल्या घरी या गोष्टीची कल्पना आहे का? नाहीतर काहीतरी गहजब होईल आणि त्याचा त्रास आपल्याला होईल. क्षमा करा; पण आपलं इथं येणं कदाचित भूदेवांना आवडणार नाही, म्हणून मी असं बोललो!''

द्वारकामाई पाहत होत्या. 'एकापेक्षा एक देखणी, तेजस्वी, लाघवी हास्य असणारी, ऋजू बोलणं असणारी ही निरागस भावंडं ! आणि यांना कर्मकांडावर बोट ठेवून धर्मसभेनं पोरकं केलं? यांचे आई-वडील यांच्यापासून हिरावून घेतले? भगवद्‌गीतेतली धर्माची ग्लानी ती हीच असेल काय?' द्वारकामाईंच्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं. तिघांना वाटलं आपलं काहीतरी चुकलंच; पण मुक्ती पुढे झाली. तिनं एका हातानं कावेरीअक्कांचा आणि दुसऱ्या हातानं द्वारकामाईंचा हात धरला आणि म्हणाली, ''दादा, अरे त्यांना आधी आत तर घेऊ द्यात. आधीच ग्रीष्माचं ऊन, त्यात माध्यान्हीची वेळ! क्षमा करा हं ! माझ्या या तिन्ही भावांना काही समजत नाही नि उमगत नाही. तुम्ही आत या. घटकाभर बसा. हे गारसं पाणी प्या. मग बोला !'' असं म्हणून त्या दोघींना हाताला धरून बसवून मुक्ता आत गेली. लोटकीतून पाणी घेऊन आली. त्या दोघींना पाणी देऊन पुन्हा आत गेली. द्रोणातून गुळाचे दोन खडे घेऊन आली. द्वारकामाई या सहा-सात वर्षांच्या मुक्तीकडे टक लावून पाहत होत्या. तिचं गोड, लाघवी बोलणं, आर्जवानं आदरातिथ्य करणं, लगबगीनं गूळ-पाणी देणं आणि मध्येच भावांची गोड तक्रार करूनही त्यांची बाजू चतुराईनं सावरणं. त्यात मुक्तीचं देखणं रूपडं, तेजस्वी डोळे, बोलके, उत्साहानं लकलकणारे, सतत काही सांगायला, विचारायला आतुर असल्यासारखे. तिचं सरळ नाक, फुगरे गाल, लाडिक जिवणी आणि भुरभुरणारे केस ! देवीचं अल्लड, कुमारी रूप पाहतो आहोत, असं त्यांना वाटलं ! गुळाचा बारीकसा खडा तोंडात टाकून दोघी पाणी प्यायल्या. बोलायला सुरुवात केली ती कावेरीअक्कांनीच. त्यांनी मुक्ताला विचारलं, ''मुक्ते, सोपाना कुठाय गं? या माई त्यालाच भेटायला आल्या आहेत !'' मुक्तीने सोपानाला हाक मारली. सोपानासह निवृत्ती-ज्ञानेश्वरही आत आले. द्वारकामाई सोपानाकडे काही क्षण पाहत राहिल्या. मग म्हणाल्या, ''बाळ, मला क्षमा कर. सकाळी चुकून तुला आंबलेला भात घातला गेला. तू माझी समजूत काढलीस खरं ! पण माझ्या मनालाच ते डाचत राहिलं. मला राहावेनाच. म्हणून मग हा ताजा भात करून मी तुमच्यासाठी घेऊन आले आहे. तो तुम्ही सर्वांनी खाल्लात, तर माझ्या मनाला बरं वाटेल.'' असं म्हणत द्वारकामाईनी भाताची तपेली पुढं ठेवली. सोपान गांगारून गेला. कोणालाच काय बोलावं सुचेना. सगळ्यांचीच परिस्थिती अवघडल्यासारखी झाली. सगळेच स्तब्ध झाले. भावनेच्या प्रश्नाचं उत्तर ज्ञानवंतांकडे नसतंच नसतं, तिथं या लहानग्यांची काय कथा? या स्तब्धतेला छेद दिला मुक्तीनं. तिच्या अजाण वयाप्रमाणं ती अजाणतेपणं बोलून गेली, ''पण आमची जेवणं आत्ताच झाली आणि एकदा जेवण झालं, की आम्ही रात्री कोरडा फराळ करतो !'' मुक्तीचं ते बोलणं ऐकून निवृत्ती-ज्ञानेश्वर गोरेमोरे झाले. सोपान खाली मान घालून उभा राहिला; पण माईंना मात्र रडू फुटलं. त्यांना हुंदका आवरेना ! आपण बोललो त्याच्या परिणामांपासून अनभिज्ञ असलेली मुक्ता पुढे म्हणाली, ''आणि पाचच घरी भिक्षा मागायची आणि जेवढं मिळेल तेच खायचं, असं माझ्या तीनही दादांचं तत्त्व ठरलेलं आहे. हो ना, निवृत्तीदादा ! मग आता यांनी आणलेलं अन्न आपण कसं खाणार?'' मुक्तीच्या या प्रश्नानं माईंना आणखीच घायाळ केलं. त्यांना तसं रडताना पाहून कावेरीअक्काही गहिवरल्या. कापऱ्या आवाजात त्यांनी निवृत्तीला विचारलं, ''बाळ, सोपानाच्या झोळीत चुकून आंबलेला भात घातला गेला, याचं माईंना वाईट वाटतंय. आपल्या हातून काहीतरी पाप घडलंय, असं त्यांना वाटतंय. त्याचं परिमार्जन म्हणून त्या ताजा भात घेऊन आल्या आहेत. तो तुम्ही स्वीकाराल तर त्यांना समाधान होईल, की हातून घडलेल्या पापाचे प्रायश्चित्त... !''

''थांबा अक्का ! थांबा ! प्रायश्चित्त म्हणू नका. प्रायश्चित्त किती जीवघेणं असू शकतं, ते आम्ही अनुभवलंय. अनुभवतो आहोत. थांबा !'' ज्ञानेशानं कावेरीअक्कांना मध्येच थांबवलं. प्रायश्चित्त या शब्दानं जणू हृदयाच्या जखमेवर बसलेली खपली निघाली होती. रक्त भळाभळा वाहू लागावं, तसं सोपान-मुक्ताच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागलं. ''आपण

यातून काहीतरी मार्ग काढू ! थोडं थांबावं !'' निवृत्तीनं हस्तक्षेप केला. काही क्षण सगळीच स्तब्ध झाली. तोच ज्ञानेश्वर म्हणाला, ''सोपाना, माईंच्या हातून जाणून-बुजून अपराध घडला आहे, असं आपल्या कुणालाच वाटत नाही; पण ही घटना तुझ्याबाबतीत घडली आहे, तेव्हा तूच काय तो मार्ग काढ. तू योग्य मार्गच काढशील, असा आमचा विश्वास आहे !'' असं बोलून ज्ञानेश्वरानं जणू प्रसंगाची सूत्रंच सोपानाकडे दिली. ज्ञानेश्वरानं असं करताच सोपानाचा चेहराही बदलला. आता त्याच्या चेहऱ्यावर एखाद्या प्रौढ व्यक्तीसारखे समंजस, विचारी भाव आले. त्यानं निवृत्तीला नमस्कार केला आणि एखाद्या धर्मशास्त्र जाणकार पंडितासारखा सोपान बोलू लागला. ''दादा, या प्रसंगातून मार्ग काढण्याची जबाबदारी आपण माझ्यावर टाकलीत. तुमची आज्ञा शिरसावंद्य मानून मी ती जबाबदारी निभावण्याचा प्रयत्न करेन. दादा, 'अन्नपूर्णे सदापूर्णे शंकर-प्राणवल्लभे। ज्ञानवैराग्य सिध्द्यर्थम् भिक्षां देहि च पार्वति।।' हा श्लोक म्हणून आपण जेव्हा भिक्षा मागतो, तेव्हा भिक्षा घालणारी ती गृहदेवता आपल्याला पार्वतीच्या, अन्नपूर्णेच्या ठिकाणी असते आणि तिनं ती घातलेली भिक्षा आपल्यासाठी प्रसाद असतो, कारण 'अन्नं ब्रह्मा रसो विष्णुर्भोक्ता देवो महेश्वरा: । प्रीयतां भगवानीश: परमात्मा सदाशिव:।' अर्थात अन्न हे ब्रह्मदेव असून, अन्नाची रुची म्हणजे विष्णू आहे. अन्न सेवन करणाऱ्यास परमात्मा सदाशिव प्रसन्न होतो. मग दादा, असं जर आहे, भिक्षा घालणारी गृहदेवता जर पार्वती आहे, तर तिच्या हातून अपराध तो होईलच कसा? माझ्याच नव्हे, तर आपल्या कुणाच्याही मनात त्यांच्याबद्दल किल्मीष नाही. दादा, मला मान्य आहे, की आपल्यावर ग्रामण्य आहे, आपण बहिष्कृत आहोत, त्यामुळे कधीकधी आपल्या माधुकरीमध्ये दगड, माती, केर, कचरा इतकंच काय, तर कधीकधी शेणगोळे आणि कधीकधी तर विष्ठाही घातली गेली आहे; पण अन्न हे जर पूर्णब्रह्म आहे, तर त्याचा जसा आहे तसा स्वीकार करायलाच हवा. राहता राहिला त्या भाताचं आम्ही काय केलं हा प्रश्न, तर ते पूर्णब्रह्म मानून आम्ही त्यातला एकेक घास खाल्ला आणि शरीरपीडा होऊ नये, म्हणून उरलेला भात आम्ही झाडामध्ये, परसदारी असलेल्या शेवग्याच्या झाडात घातला. माई, आतातरी तुमच्या मनातली ही अपराधीपणाची भावना काढून टाका.'' सोपानाचं बोलणं ऐकून निवृत्तीला कौतुक वाटलं. ज्ञानेश्वरानंही समाधानानं मान डोलावली. (क्रमश:)


**- सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००

**दिनविशेष (ऑक्टोबर २०२३)**
**भाद्रपद - अश्विन १९४५**
**शोभननाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**




**रविवार दि. १ :** रक्तदान दिन, ज्येष्ठ नागरिक दिन, **सोमवार दि. २ :** म. गांधी जयंती, संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ८.३७), लाला बहाद्दूर शास्त्री जयंती, **बुधवार दि. ४ :** श्री ज्ञानेश्वरी जयंती, **शनिवार दि. ७ :** वन्यपशू दिन, **रविवार दि. ८ :** वायूसेना दिन, **सोमवार दि. ९ :** टपाल दीन, **शनिवार दि. १४ :** सर्वपित्री आमावास्या, **रविवार दि. १५ :** घटस्थापना, शारदीय नवरात्रारंभ, **गुरुवार दि. १९ :** ललिता पंचमी, **रविवार दि. २२ :** महालक्ष्मी जागर, **सोमवार दि. २३ :** खंडे नवमी, **मंगळवार दि. २४ :** विजयादशमी, **गुरुवार दि. २६ :** बाळूमामा जन्मोत्सव, **शनिवार दि. २८ :** कोजागरी पौर्णिमा, **सोमवार दि. ३० :** पंत बाळेकुंद्री समाधी उत्सव प्रारंभ, **मंगळवार दि. ३१ :** सरदार पटेल जयंती, इंदिरा गांधी स्मृतिदिन.

# मुस्लिम स्त्री कलाकार

## जद्दनबाई

या लेखमालेतील दुसरी कलाकार आहे 'जद्दनबाई हुसेन'. जद्दनबाई यांचा जन्म १८९२ साली झाला. जद्दनबाई या गायिका, संगीतकार, नृत्यांगना, अभिनेत्री अशा विविध कला असलेल्या अशा व्यक्ती होत्या.

जद्दनबाई व सरस्वतीदेवी या भारतीय चित्रपट-सृष्टीतील पहिल्या स्त्री संगीतकार होत्या. शहरात येऊन त्यांनी (जद्दनबाईंनी) गाणी म्हणायला सुरुवात केली. परंतु सराव नसल्यामुळे त्यांना गायिका म्हणून प्रसिद्धी मिळत नव्हती. त्यानंतर त्या कलकत्ता येथे गेल्या आणि श्रीमंत गणपतराव (भय्यासाहेब सिंदिया) यांच्या शिष्या बनल्या. परंतु १९२० साली श्रीमंत गणपतराव यांचा मृत्यू झाला तेव्हा त्यांचे शिक्षण अर्धवटच झाले होते.

म्हणून गायकीचे पुढील शिक्षण जद्दनबाई यांनी उस्ताद नोईनुद्दीन खान यांच्याकडे घेतले. त्यानंतर त्यांनी उस्ताद चद्दखान व उस्ताद लाब खानसाहेब यांच्याकडे शिक्षण घेतले.

जद्दनबाई यांचे संगीत खूप प्रसिद्ध झाले आणि त्या त्यांच्या आईपेक्षाही जास्त चांगल्या तवायफ म्हणून प्रसिद्ध झाल्या. नंतर त्यांनी कोलंबिया ग्रामोफोन कंपनीबरोबर गझलांचे रेकॉर्डिंग सुरू केले. नंतर त्यांना रामपूर, बिकानेर, ग्वाल्हेर, जम्मू-काश्मीर, इंदोर व जोधपूर अशा विविध राजघराण्यांकडून मेहफिलीसाठी आमंत्रण यायला लागली. वेगवेगळ्या रेडिओ केंद्रांवर त्यांचे कार्यक्रम व्हायला लागले.

१९३३ साली लाहोरमधील एका कंपनीने त्यांना 'राजा गोपीचंद' या सिनेमात काम करण्यासाठी बोलावले. त्यात त्यांनी प्रमुख ॲक्टरच्या आईची भूमिका केली. नंतर त्यांनी 'इन्सान या शैतान' या सिनेमात काम केले.

त्यांनी 'संगीत फिल्मस्' या निर्मिती संस्थेमार्फत १९३५ साली 'तलाश ए हक्' या सिनेमाची निर्मिती केली. त्यात जद्दनबाईंनी स्वत: भूमिका केली होती व त्याचे संगीतही त्यांनीच दिले होते.

जद्दनबाई यांचे पहिले लग्न नरोत्तमदास खत्री नावाच्या एका श्रीमंत हिंदू व्यापाऱ्याबरोबर झाले. त्याचें दुसरे लग्न उस्तात ईर्शाद मीर खान यांच्याबरोबर झाले. त्यांचे तिसरे लग्न मोहनचंद उत्तमचंद या श्रीमंत माणसाबरोबर झाले.

इर्शाद मीर खान या दुसऱ्या नवऱ्यापासून त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव अन्वर हुसेन. अन्वर हुसेन हा एक चांगला अभिनेता होता. त्याने एकंदर २०० हिंदी चित्रपट गाजवले होते. तिसरा नवरा, ज्याचे नाव मोहनचंद उत्तमचंद होते, त्यांच्यापासून तिला मुलगी झाली, तीच नर्गिस. नर्गिस या अभिनेत्रीबद्दल काही सांगायची गरजच नाही. तिच्या तिसऱ्या नवऱ्याचे आडनाव त्यागी असे होते. त्यामुळे जद्दनबाई या जयादेवी त्यागी या नावानेही ओळखल्या जात असत.

१९३५ साली 'तलाशे हक' हा चित्रपट आला. त्याची निर्मिती व दिग्दर्शन जद्दनबाई यांनी केलं होतं. एवढेच नाही, तर त्या सिनेमात त्यांनी अभिनय केला होता, त्यातील गाणी म्हटली होती व संगीतही त्यांनीच दिलं होतं. म्हणजे सब कुछ जद्दनबाई असं होतं.

१९३६ साली त्यांनी 'मॅडम फॅशन' हा सिनेमा प्रदर्शित केला. त्यात सुद्धा सब कुछ जद्दनबाई असंच होतं. त्यांची ठुमरी गायकी अतिशय प्रसिद्ध होती. त्यांच्या ठुमरी गायनाच्या कार्यक्रमात तेव्हा त्यांच्यावर सोन्या-चांदीच्या नाण्यांची खैरात होत असे.

त्याकाळी जद्दनबाई यांनी सारी चित्रपटसृष्टी व्यापून टाकली होती. त्यांची काही गाजलेली गाणी खालीलप्रमाणे आहेत.

(१) फूल गेंदवा ना मारो, लागत करेजवा में चोंट ही त्यांची ठुमरी खूपच गाजली.

(२) ना जा बलम परदेसवा

(३) नयनोंसे नयना मिलाये, अरे हा रे परदेसिया

(४) रूप जोबन गुन धरो राहत हम - ही राग दुर्गामधील बंदिश त्यांनीच गायली आहे.

शास्त्रीय रागात त्यांच्या कांही रेकॉर्डस् निघाल्या होत्या. त्यापैकी 'शंकरा' रागामधील 'जय जय देवा' ही चीज खूप प्रसिद्धीस आली होती. त्यांनी बरीच गाणी म्हटली पण त्याच्या रेकॉर्डस् नसल्याने ती गाणी लोकांपर्यंत पोहचू शकली नाहीत.

अशा चौफेर व्यक्तीमत्त्व असलेल्या व चित्रपटसृष्टी गाजवून सोडणाऱ्या जद्दनबाई १९४९ मध्ये मुंबई येथे अनंतात विलीन झाल्या.

**- प्रकाश गानू,**

# इरावती कर्वे



इरावती नदीच्या किनारी जन्माला आली म्हणून आईबाबांनी तिचे नाव इरावती ठेवले असावे. ब्रह्मदेशात जन्म झाला असला तरी शाळेपासून पुणेकर असलेल्या इरावती करमरकर म्हणजे शहराचे एक मोठे बौद्धिक वैभव होते. हुजूरपागा शाळेत वसतिगृहात काही काळ काढल्यानंतर या मुलीची रवानगी प्रि. परांजपे यांच्या घरी झाली. कारण एक तर त्यांचे नाते होते आणि एवढी लहान मुलगी वसतिगृहात राहते हे त्यांना पटणारे नव्हते. या मुलीनेही या घरातून संस्कार घेतले.आपल्या मूळ तल्लख असलेल्या बुद्धीला येथील वातावरणाने अधिक चमकदार केले. डेक्कन जिमखाना क्लबला टेनिस खेळणारी, तिथल्या टिळक तलावात कॉस्च्यूम घालून बिनधास्त पोहोणारी मुलगी म्हणून तिने आपली वेगळी ओळख निर्माण केली होती.

शकुंतला परांजपे आणि इरावती करमरकर या वर्गमैत्रिणी. त्या सायकलवरून जाताना दिसल्या की अवघे पुणे शहर वळून वळून पहायचे. कारण पुण्यात सायकल आणि मुलगी हे दृश्य तेंव्हा दुर्मीळ होतं. अहो एवढेच काय पुण्यात जेंव्हा Lambretta स्कूटर आली तेंव्हा तिची पहिली ग्राहक ही मुलगी होती. डेक्कन कॉलेजला याच वाहनावर बसून ती जात असे.

'द चितपावन ब्राह्मिन्स – द एथ्निक स्टडी' हा विषय घेऊन एम. ए झालेली ही मुलगी थेट जर्मनीत पोहोचली. आणि भरपूर अभ्यास करून तिने आपला डॉक्टरेटचा प्रबंध सादर केला. मानवी कवटीतील असमानता (द नॉर्मल आसिमेट्री ऑफ ह्यूमन स्कल) या सारखा विषय घेऊन अभ्यास करणारी ही मुलगी आपल्या पुण्यातील डेक्कन कॉलेजला येऊन प्रपाठक म्हणून रुजू झाली आणि समाजशास्त्र –मानव वंशशास्त्र–मानसशास्त्र या विषयांकडे व्यापकतेने पाहणारी विद्वान शिक्षिका विद्यार्थ्यांना लाभली. ह. धी. सांकलिया यांसारख्या विद्वान प्राध्यापकांच्या साथीने डेक्कन कॉलेजमधील अनेक मुलभूत संशोधनात त्यांनी आपल्या चिकित्सक बुद्धीचे दर्शन घडवले.

धर्म, इतिहास, जनुक शास्त्र, जाती व्यवस्था, अनुवांशिकता, सामाजिक उतरंडीची स्थिती अशा अनेक कळीच्या मुद्द्यांना हात घालत त्यांनी आपल्या देशाचे सामाजिक चित्र संशोधनाच्या साहाय्याने पुरावे देवून मांडले. हे त्यांचे मौलिक योगदान आपल्याला विसरता येणार नाही. भारतातील सारे जण अगदी इथलाच मानला जाणारा आदिवासी समाज हा बाहेरून आला आहे हे गृहीतक सिद्ध करणारे त्यांचे संशोधन आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजले गेले. सत्तर हजार वर्षे मागे गेले तरी या देशात मानवी अवशेष सापडलेले नाहीत ही त्यांनी केलेली नोंद या त्यांच्या कामाला – गृहितकाला पुष्टी देणारीच ठरली.

देशभर पायपीट करून त्यांनी मानवातील कुटुंब व्यवस्था आणि त्यातील नाते संबंधांचे सखोल संशोधन केले. जाती जमातींमधील परंपरा, विवाह पद्धती, वधू वर निवडीचे जातीनिहाय निकष, दत्तक पद्धती, विधवांची स्थिती, मृत्यू नंतरचे विधी, सूतक पाळण्याची कारणे अशा अनेकविध विषयांवर त्या हजारो मंडळींशी थेट बोलल्या, त्याच्या शास्त्रशुद्ध नोंदी केल्या आणि यातून 'किनशिप ऑर्गनायझेशन इन इंडिया' हा ग्रंथ आकाराला आला.

भारतीय समाजशास्त्र या विषयावरचा संदर्भ ग्रंथ म्हणून आजही अभ्यासक याकडे पाहतात .लंडन विद्यापीठ आणि बर्कले येथील कॅलिफोर्निया विद्यापीठातील अभ्यासकांनी या विदुषीचे व्याख्यान ऐकल्यानंतर दिलेली दादही त्यांच्या व्यासंगाला दिलेली सलामीच होती.

'युगांत' सारख्या पुस्तकातून त्यांनी महाभारतातील अनेक व्यक्तिरेखा आणि प्रसंगांचे अत्यंत समतोल विश्लेषण केले आहे. महाभारताकडे एका समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहायला हे लेखन उद्युक्त करते. परंपरागत अशा भाबडेपणाच्या संकुचित आवारातून वस्तूनिष्ठतेच्या प्रदेशात हे पुस्तक आपल्याला घेऊन जाते. साहित्य अकादमी पुरस्काराला हे पुस्तक पात्र ठरले नसते तरच नवल होते. यांचा जीवनपट म्हणजे व्यासंग, अभ्यास, संशोधन आणि सामाजिक जाणीव यांचा अनोखा संगम म्हणावा लागेल.

धोंडो केशव कर्वे यांची सून आणि प्रा. डी. डी. कर्वे यांची पत्नी म्हणून त्यांची ओळख करुन द्यावी अशी वेळ त्यांच्यावर कधी आली नाही. महर्षी कर्वे यांच्या अफाट कर्तुत्वाविषयी टिपणी करताना त्यांनी केलेलं मार्मिक विधान कर्व्यांच्या खडतर अशा वैवाहिक आयुष्यावर प्रकाश टाकते. त्या म्हणतात – 'केवढे माझे भाग्य, की मी अशा माणसाची सून झाले! त्याहीपेक्षा केवढे महत्तर माझे भाग्य, की मी अशा माणसाची बायको झाले नाही!!' लेखिका गौरी देशपांडे, जाई निंबकर आणि शास्त्रज्ञ आनंद कर्वे यांच्या आई म्हणूनही ओळखल्या जाणाऱ्या डॉ. इरावती कर्वे यांचा हा स्मृतिदिन – (मृत्यू : ११ ऑगस्ट, १९७०) त्यांना विनम्र आदरांजली !

**– डॉ. केशव साठये**
keshavsathaye@gmail.com

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**
**गोखले ब्रदर्स**
**सराफी दुकान**
**मंगळवार, दि. 15 : पुष्य नक्षत्र**
आपलं दुकान
**महाद्वार रोडवर,**
0231–2546585

# म्हणींचे म्हणणे

## चोराच्या मनात चांदणं !

चला... पटपट आवरून दप्तर घ्या बॅगा अन् डबे घेऊन शाळेला निघा. आजोबानी फर्मान सोडलं, विनू, चंद्या, सुधी, नीमा सगळी जण आजोबांच्या आवाजासरशी भराभरा आपापल्या कामाला लागली. घरात आजोबांचा शब्द शेवटचा.. पुढे कुणी काही बोलायचं नाही अन तक्रार करायची नाही. दादा, बाबा, सदाकाका, काकू, सुशी आत्या आजी आणि माई  मोठी माणसेसुद्धा आजोबा घरात आले म्हटलं की घाबरून  वागायची.. निदान तसं वाटायचं तरी. त्यामुळे मुलांची तर टापच नव्हती काही बोलायची.

रोजचा दिनक्रम ठरलेल्या वेळेत – घड्याळानुसार अन् ठरल्याप्रमाणे व्हायचा.त्या दिवशी शाळेत चंद्याचे वर्गात मोठे भांडण झाले. वर्गातल्या एका टग्या मुलाशी– सोम्याशी त्याने वाद घातला. त्या मुलाने वर्गात जाऊन चंद्याला धाक दाखवला. चंद्या म्हणाला हे बघ शाळेत आम्ही सगळे शिक्षकांनी सांगितलेल्या गोष्टी ऐकतो..तुझी दांडगाई चालणार नाही. हो–हो– नाही नाही. तू तू– – मी – मी करता करता दोघांची चांगली जुंपली. वातावरण एकदम तंग झाले. सोम्याने चंद्याचा गळा धरला आणि पाठीत जोराचा फटका मारला.चंद्या एकदम हडबडला..त्याला दोन मिनिटं काही सुचलं नाही. जरा सावरल्यावर त्याने त्याचा हात पकडला. पण तेवढ्यात विनू सुधा – निमा आपल्या वर्गातून येऊन चंद्याला समाजावू लागले. शेवटी होता होता प्रकरण शिक्षकांपर्यंत गेले. हेडमास्तरांनी या दोघांना ऑफिसमधे बोलवून घेतले.

काय झाले? शांतपणे हेडमास्तरांनी विचारले. दोघही गप्प.

का भांडलात? ते ही सगळ्या शाळेला कळेल अशा पध्दतीने!

का भांडलात? हेड मास्तरांनी पुन्हा प्रश्न केला.

सर हा चंद्या माझ्या अंगावर धावून आला. सोम्या मोठ्याने आपली बाजू हेडसरांना सांगू लागला.

चंद्या म्हणाला, ‘सर, मी अजिबात त्याची छेड काढली नाही. मी फक्त त्याच्या दांडगाईला घाबरलो नाही. म्हणून त्याने माझा गळा धरला. आणि...’

इतक्यात सोम्याही तावातावाने बोलू लागला.

‘बास... मला पुढे काही ऐकायचे नाही. उद्या येताना आपल्या घरातल्या मोठ्या माणसांना घेऊन शाळेत यायचं.’ हेडमास्तरांनी फर्मान सोडलं आणि त्या  दोघांनाही वर्गात जायला सांगितले.

एकमेकांकडे रागाने बघत बुक्की मारण्याचे हातवारे  करत दोघंही व्हरांडातून वर्गाकडे चालले. एकदम सोम्या म्हणाला, ‘चंद्या, आण उद्या तुझ्या आज्याला शाळेत. माझ्या बाबांना मी आणतो. बघ, तुझी करी जिरवतो ते!!’

शाळा सुटली अन् सगळे घरी आले – विनू, सुधी, निमा सगळे चिडीचुप... शहाण्या मुलांसारखे.

आजोबा अजून घरी आले नव्हते. गावांतून येता येता दिवसभराच्या घडामोडी आजोबांच्या कानावर येणारच. चंद्याला आजोबा दिसायच्या आधीच आजोबांचा चेहेरा दिसायला लागला होता. आजोबांना कोण समजवणार? कारण चुकीचे वागलेले आजोबांना अजिबात खपणार नव्हते. पण आजोबा आपले म्हणणे ऐकून नक्की घेतील हेही त्याला माहित होतं.

इतक्यात बाहेर आजोबांचा आवाज आला. पडवीत चप्पल काढत काढतच आजोबांनी माईला हाक मारली. चहाचं आधण ठेव सांगितले.

विनू, सुधी चुपचाप पुस्तकात डोकं घालून बसली.

आजोबा हातपाय धुवून घरात आले. चहा घेतला अन् ओसरीवर बसून चंद्याला हाक मारली. चंद्या एकदम सटपटला... काय सांगावं आजोबांना? पण जे जसं घडलं तसच सांगावं... काय होईल, फारतर आजोबा शिक्षा करतील... चालेल मला... असं मनातल्या मनात म्हणत चंद्या आजोबांकडे आला.

आजोबांनी चंद्याला शाळेतल्या झालेल्या घटनेबद्दल विचारलं...

'शाळेच्या हेडमास्तरांनी सगळा वृत्तांत कानावर घातला होता, पण सोम्या आणि सोम्याचे वडील वाटेत भेटून तावातावाने चंद्या कसा चुकीचा वागला, कशी मारहाण केली हे सांगितले. त्यांचं म्हणणं चंद्याने धक्काबुक्की केली, मारामारी केली.

आजोबा शांतपणे बोलत होते. चंद्याला बरं वाटलं. त्याने जे जे घडलं ते तसंच्या तसं सांगितलं.

आजोबांच्या लक्षात आले. आपल्याला वाटेत गाठून कांगावा करत चंद्याने आपल्याला मारलं, मी काहीच केलं नाही असं सोम्याने खोटेच सांगितलं. वर त्याच्या वडिलांनी चंद्या किती चुकीचा वागला, सोम्याने अजिबात काही केलं नाही असेच सांगितले. आजोबांच्या लक्षात आले, सोम्या तसा मान्य करणार नाही आणि त्याचे वडीलही ते मान्य करणारे नाहीत. आता वेगळाच मार्ग अवलंबावा लागणार. आजोबांनी विषय तिथेच थांबवला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सोम्या व सोम्याच्या वडिलांना आजोबांनी बोलावून घेतले. दोघे ही अजून घुश्यातच होते. आजोबांनी सोम्याच्या समोर चंद्याला बोलावून घेतले अन् काय झालं ते विचारले. चंद्याने बोलायला सुरुवात केली. आणखी काही बोलणार इतक्यात सोम्या म्हणाला, 'तू हाणामारी केलीस. मला धक्काबुक्की केली. पहिलं तू मारलंस. माझा राग राग केलास.'

चंद्या म्हणाला, 'मी फक्त चापटी मारली.'

सोम्या म्हणाला, 'हां हां... बघा बघा. यानेच मारलं मला. मग मी फक्त गळा धरून पाठीवर फटका मारला त्याच्या !'

आजोबा हसले. ते मोठ्या आवाजात म्हणाले, 'सोम्या, तू तर मान्य करत नव्हतास की तू चंद्याला मारलयस. मग आता...?'

सोम्या आणि सोम्याचे बाबा सटपटले...

आवेशात बोलताना आपण बोलून गेलोय हे सोम्याच्या ध्यानात आले. आपली पुरती फजिती झालीय. काल आरडाओरड करत, कांगावा करत आजोबांना चंद्याच्या विरुद्ध केलेल्या तक्रारीला काही अर्थ नाही हे त्याला कळून चुकले.

सोम्याच्या बाबांना देखील आपली फट् फजिती लक्षात आली. दोघांनी शेवटी काढता पाय घेतला.

हे म्हणजे असं झालं... 'चोराच्या मनात चांदणं'!

**– वैदेही जोशी,**

मोबा. ९५४५६३५४६५

## श्री. चंद्रकांत मोडक यांना 'बाबा फौंडेशन'चा पुरस्कार



श्री. चंद्रकांत विश्वनाथ मोडक, सेवानिवृत्त अधीक्षक, जिल्हा सत्र न्यायालय यांना कोल्हापूर येथील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था 'बाबा फौंडेशन'चा 'राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार' देण्यात आला आहे. रविवार, दि. १३ नोव्हेंबर २०२२ रोजी राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर येथे संस्थेच्या दुसऱ्या वर्धापनदिनानिमित्त जाहीर समारंभात मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ४ : कर्म ब्रह्मार्पण योग**

**श्रीभगवानुवाच ।**

**कर्म ते कर्म पाहे । अकर्म ते कर्म म्हणोनि राहे ।**
**तो मनुष्यलोकी बुद्धिमंत होय ।**
**योगी सर्व कर्म करितसे ।।**
कर्मीं अकर्म जो पाहे अकर्मीं कर्म जो तसें ।
तो बुद्धिमंत लोकांत तो योगी कृत-कृत्य तो ।।१८।।

**जो सर्व कर्म करी । संकल्प कामना त्यजुनी आदरी ।**
**ज्ञानाग्नीने कर्म जाळी तरी । तो बोलिजे ज्ञानिया ।।**
उद्योग करितो सारे काम-संकल्प सोडुनी ।
ज्ञानानें जाळिलीं कर्में म्हणती त्यास पंडित ।।१९।।

**जो कर्माचा फलसंग त्यजी ।**
**नित्य तृप्त होउनी निराश्रय यजी ।**
**जो प्रकृतिकर्म सहजी । न बांधिजेल तो ।।**
नित्य-तृप्त निराधार न राखे फल-वासना ।
गेला गढूनि कर्मांत तरी काहीं करी चि ना ।।२०।।

**चित्त आत्मा नेमुनी निरसी । सांडी सर्व परिग्रहासी ।**
**केवळ कर्म करी शरीरासी । तरी न पवे तो शुद्ध जाण ।।**
संयमी सोडुनी सर्व इच्छेसह परिग्रह ।
शरीरें चि करी कर्म दोष त्यास न लागतो ।।२१।।

**अलाभी दु:ख लाभी संतोष न धरी ।**
**सिद्धी असिद्धीची कल्पना न करी ।**
**द्वंद्वातीत निस्पृह विचारी ।**
**ऐसे कर्म करी तो न बाधिजेल ।।**
मिळे तें चि करी गोड न जाणे द्वंद्व मत्सर ।
फळो जळों जया एक करूनि हि न बांधिला ।।२२।।

**ज्ञान स्थिरावुनी जरी । गत संगमुक्त धरी ।**
**ऐसे जाणोनी कर्म आदरी । तरी समग्र पापें जातील ।।**
ज्ञानांत बैसली वृत्ति संग सोडूनि मोकळा ।
यज्ञार्थ करितो कर्म जाय सर्व जिरूनि तें ।।२३।।

**अर्पण हव्य आणि अग्नि । होमकर्ता ते ब्रह्म जाणुनी ।**
**ब्रह्म कर्म समाधी करूनी । तो ब्रह्मचि पावे ।।**
ब्रह्मांत होमिलें ब्रह्म ब्रह्मानें ब्रह्म लक्षुनी ।
ब्रह्मीं मिसळलें कर्म तेव्हां ब्रह्म चि पावला ।।२४।।

**एक योगी ऐसे करिती । ब्रह्मयज्ञ म्हणोनि उपासिती ।**
**एक साक्षात्‌ अग्नि होमिती । ब्रह्मार्पण म्हणोनिया ।।**
देवताराधनें यज्ञ योगी कोणी अनुष्ठिती ।
ब्रह्माग्नींत तसे कोणी यज्ञें यज्ञत्व जाळिती ।।२५।।

**श्रोत्रादि जी ज्ञानेंद्रिये । संयमाग्नीसी होमिती तयें ।**
**शब्दादि विषयें । ते इंद्रियाग्नि होमिती ।।**
श्रोत्रादि इंद्रियें कोणी संयमाग्नींत होमिती ।
कोणी विषय शब्दादि इंद्रियाग्नींत अर्पिती ।।२६।।



## सन्मानपत्र

**(कै. सुलभा व कै. नारायण खाडिलकर, सांगली यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कुटुंबियांच्या सहकार्याने दिला जाणारा 'सामाजिक कार्यकर्ता' सन्मान)**

# माननीय डॉ. सौ. राधिका नंदकुमार जोशी

आज कोल्हापूर चित्पावन संघातर्फे हा 'सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार' देऊन आपला गौरव करताना आम्हाला मनापासून आनंद होत आहे.

आपण कोल्हापुरातील एक प्रथितयश डॉक्टर आहात. गेली सुमारे ४५ वर्षे आपण रुग्णसेवा करीत आहात. या काळात किशोरवयीन मुली आणि महिलांच्या आरोग्यविषयक अनेक शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम यांचे आयोजन आपण केले असून त्यातून प्रामुख्याने गर्भाशयाचा आणि स्तनांचा कर्करोग, मेनॉपॉज व किशोरवयीन आरोग्य तसेच शारीरिक फिटनेस या विषयांना प्राधान्य देऊन आपण प्रबोधन केले आहे.

सुप्रसिद्ध कामा आणि अल्बलेस हॉस्पिटल, मुंबई, गोकुलदास तेजपाल हॉस्पिटल, मुंबई तसेच गांधी मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथून प्रशिक्षण आणि अनुभव घेऊन कोल्हापुरात आल्यावर आपले स्वत:चे खाजगी हॉस्पिटल सायटोलॉजी क्लिनिक तसेच सावित्रीबाई फुले रुग्णालय आणि कराड येथील कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस येथे आपण प्रॅक्टिस करू लागलात.

ग्रामीण क्षेत्रांतील महिलांसाठी आपण अनेक कर्करोग शोध शिबिरे तसेच समूह तपासणी शिबिरांचे आयोजन केले आहे. कोमल न्यू लाईफ फौंडेशन सोबत अवयवदान जनजागृती उपक्रम राबविला आहे. सध्याही आपल्या यशोमंगल चॅरिटेबल ट्रस्टमार्फत आपल्याकडे एच.पी.व्ही. तपासणी सवलतीच्या दरात सुरू आहे. दहा वर्षांवरील मुलींसाठी सवलतीच्या दरातील एच.पी.व्ही. लसही उपलब्ध करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहात.

आपण इंडियन ॲकॅडमी ऑफ सायटोलॉजीच्या आजीव सभासद आहात. गायनॅकोलॉजी आणि ऑब्स्टेट्रिक्स सोसायटीच्या कोल्हापूर विभागाच्या आपण माजी अध्यक्ष आहात. विविध देशांमध्ये सेमिनार, स्टडी टूर्स आणि पेपर प्रेझेंटेशनच्या निमित्ताने आपण जगभर प्रवास केला आहे. आपल्या विषयातील अनेक पुस्तकांच्या आपण सहलेखिका आहात. कोल्हापूर मेडिकल असोसिएशननेही दि. २० मार्च २०२२ रोजी 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन आपला सन्मान केला आहे. भारत सरकारनेही आपल्या प्रसूतीविषयक संशोधनाबद्दल आपणाला पेटंट बहाल केले आहे.

आपणासारख्या वैद्यकीय क्षेत्रातील सामाजिक कार्यात सक्रिय असणाऱ्या कार्यकर्तीला आपल्या या नि:स्वार्थी कार्याच्या गौरवार्थ कै. सुलभा व कै. नारायण खाडिलकर, सांगली यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कुटुंबियांच्या सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघातर्फे दिला जाणारा हा 'सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार' आणि 'सन्मानपत्र' प्रदान करताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

आपणाला उत्तम आयुरारोग्य लाभो आणि आपल्या हातून हे सामाजिक कार्य असेच अखंड सुरू राहो ही भगवान श्रीपरशुराम व श्रीअंबाबाईचे चरणी प्रार्थना !

दि. ९ सप्टेंबर २०२३

**आपले नम्र,**

| **केदार व. जोशी** | **प्रसाद प्र. भिडे** | **नंदकुमार दि. मराठे** |
|---|---|---|
| कार्यवाह | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**आणि सर्व संचालक मंडळ सदस्य, कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर**



**सन्मानपत्र**

**(कै. सुलभा व कै. नारायण खाडिलकर, सांगली यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कुटुंबियांच्या सहकार्याने दिला जाणारा 'सामाजिक कार्यकर्ता' सन्मान)**

# माननीय श्री. धनंजय वामन नामजोशी

सर्पमित्र, प्राणीमित्र, पक्षीमित्र, निसर्गमित्र, मिमिक्री आर्टिस्ट, व्हॉईस ओव्हर आर्टिस्ट, रक्तदाता, अध्यक्ष–फाईट अगेन्स्ट थॅलेसेमिया ऑर्गनायझेशन, महाराष्ट्र, अध्यक्ष–ब्लड ॲट ट्वेंटीफोर बाय सेव्हन ग्रुप इतकी बिरुदे आपल्या नावापूर्वी लावावी लागत असल्याने आपण सामान्यातील असामान्य व्यक्तिमत्त्व आहात असे अभिमानाने म्हणावे लागते.

लहानपणापासून आपणाला पशू–पक्ष्यांबद्दल कुतूहल वाटत राहिले आहे. वडिलांच्या प्राणी–पक्षी प्रेमामुळे ते वाढतच गेले. २००४ साली पहिल्या सापाला जीवदान देऊन निसर्ग वाचविण्याचे सुरू केलेले आपले कार्य गेल्या १९ वर्षांत सुमारे २५०० विषारी, बिनविषारी, निमविषारी सर्पांना पकडून त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडून देत, मुक्या जीवांना जीवनदान देत, आजही चालू आहे. प्राणीमित्र म्हणून आजवर १००० पेक्षा जास्त जखमी पक्षी–प्राण्यांवर स्वखर्चाने उपचार करून त्यांचे जीव वाचवण्याचे कार्य आपण केले आहे. प्राणी–पक्षी–साप यांच्याबद्दल समाजात असलेल्या नाना अंधश्रद्धा व गैरसमज दूर करण्यासाठी शाळा, कॉलेजिस आणि सामाजिक संस्थांमधून जनजागृतीपर व्याख्यानेही आपण देत आहात.

रक्तातील गुणसूत्रांमुळे, अनुवांशिकतेने मुलांना होणारा भयानक आजार म्हणजे थॅलेसेमिया ! या रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यासाठी वेळेत रक्त उपलब्ध करून देणे, औषधे व महागड्या तपासण्या मोफत करून देणे, शस्त्रक्रियेसाठी सरकारी व बाहेरून मदत मिळवून देणे अशी मानवतेची अनेक कामे संस्था–अध्यक्ष या नात्याने आपण करीत असता.

जिज्ञासेतून आपण मिमिक्री करू लागलात आणि एकलव्याप्रमाणे त्या कलेत पारंगत झालात. आज जवळपास ६० कलाकार, राजकारणी, गायक आदींचे हुबेहुब आवाज आपण काढता. पण या कलेचा उपयोग अंध, अनाथ, निराधार, वृद्ध, दिव्यांग, रुग्ण अशा दुःखाने पिचलेल्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी गेली १७ वर्षे मोफत कार्यक्रम सादर करून आपण करीत आहात.

आपण २० वर्षे रक्तदानाच्या क्षेत्रात कार्यरत आहात. या काळात अनेकांना रक्त दिले, अनेकांना मिळवून दिले. रुग्णसेवेसाठी धडपडणाऱ्या मित्र व रक्तदात्यांना एकत्र करून व्हॉटस्ॲपवर समविचारी कार्यकर्त्यांचा Blood @ 24 x 7 Group ची स्थापना करून मिडियाचा चांगल्या लोकोपयोगी कामासाठीही उपयोग करता येतो हे तुम्ही सिद्ध केलेत. आज मेसेज मिळताच अर्ध्या तासात आपण रुग्णाला कोणत्याही गटाचे रक्त पुरवू शकता. या सर्व कार्यातून आपला सामाजिक मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो.

आज कोल्हापूर चित्पावन संघातर्फे आपणा सारख्या दीनदुबळ्यांसाठी धडपडणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यास कै. सुलभा व कै. नारायण खाडिलकर, सांगली यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कुटुंबियांच्या सहकार्याने देण्यात येणारा 'सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार' देताना आम्हांस आनंद होत आहे.

आपल्या हातून हे सामाजिक कार्य असेच सुरू राहो व आपणाला उत्तम आयुरारोग्य लाभो ही भगवान श्रीपरशुराम व श्री अंबाबाईचे चरणी प्रार्थना !

दि. ९ सप्टेंबर २०२३

**आपले नम्र,**

| **केदार व. जोशी** | **प्रसाद प्र. भिडे** | **नंदकुमार दि. मराठे** |
|---|---|---|
| कार्यवाह | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**आणि सर्व संचालक मंडळ सदस्य, कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर**

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - ऑक्टोबर २०२३)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मिनल B +ve | कोकणस्थ | १४/५/२००० ५.२ | वत्स, कन्या हस्त, तिसरे, आद्य, देवगण | M.Sc. कथ्थक विशारद | खाजगी नोकरी | वा.प्रा. २ लाख | विनायक वासुदेव सोवनी विष्णू गल्ली, तासगाव सांगली. ९८२२८५६९६६ |
| २. | कौमुदी O +ve | कोकणस्थ | १०/९/९८ ४.११ | गार्ग्य, मेष, भरणी, पहिले, मध्य, मनुष्य | B.Com. GDC&A | --- | --- | चैतन्य शंकर गाडगीळ गणेश मंदिराजवळ, सातारा मो. ९८९००१६४४४ |
| ३. | दिन्या AB +ve | देशस्थ | २६/६/९७ ५.३ | जमदग्नी, कुंभ पूर्वाभाद्र, द्वितीय आद्य, मनुष्य | B.E. | --- | --- | दत्तात्रय कुलकर्णी मु.पो.बेळगाव. मो. ९७३९०२२६१२ |
| ४. | पियुषा B +ve | कोकणस्थ | ४/१०/९६ ४.११ | शांडिल्य, मिथुन, आर्द्रा, तिसरे, आद्य, मनुष्य | B.Com M.Com DTL | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १.८० लाख | सतीश जोशी टाकाळा, कोल्हापूर. मो. ९९२२२७२९५९ |
| ५. | प्रियांका A +ve | कोकणस्थ | १/२/९६ ५.४ | भारद्वाज, मिथुन आर्द्रा, दुसरे, आद्य, मनुष्य | B.E. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १३ लाख | बाळकृष्ण विष्णू रानडे आजरा, जि. कोल्हापूर. मो. ९९६०४५७४०९ |
| ६. | निशा O +ve | देशस्थ | ८/८/९५ ५.२ | वसिष्ठ, धनु पूर्वाषाढा, प्रथम मध्य, मनुष्य | B.E. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ७.८० लाख | केतकी उपाध्ये शिवाजी पेठ, कोल्हापूर. मो. ९४२०९७०११५ |
| ७. | स्नेहल O +ve | कोकणस्थ | २३/१/९५ ५.४ | कौशिक, कन्या, चित्रा, पहिले मध्य, राक्षस | B.Com. M.Com CA Inter | कराड येथे नोकरी | वा.प्रा. ४ लाख | मधुकर गोडबोले कृष्णा कॅनेल, कराड मो. ९५५२३८५८७८ |
| ८. | शुभदा O -ve | देशस्थ | १२/५/९५ ५.६ | भारद्वाज, कन्या, चित्रा, पहिले मध्य, राक्षस | M.Com. | --- | --- | विवेक दत्तात्रय पुजारी शिवाजीनगर, सांगली. मो. ८८०६६४९९०३ |
| ९. | कल्याणी B +ve | देशस्थ | ५/५/९२ ५.४ | काश्यप, वृषभ मृग, दुसरे मध्य, देवगण | General Management | यु.एस.ए. | १७ लाख | अरुण इनामदार बेळगांव मो. ९४४९०६६००५ |
| १०. | डॉ.सायली O +ve | देशस्थ | १२/२/९३ ५.२ | मुनीभार्गव, तुळ स्वाती, दुसरे, अंत्य, देवगण | B.D.S. | एंटरशिप सोलापूर येथे | २५,०००/- | संजीव जोशी सोलापूर. मो. ९४२०४८८९२५ |

### यशश्री गणेश राव

**जन्मतारीख :** १८/११/२००० **पोटशाखा :** देशस्थ
**शिक्षण :** B.Sc. (BCS) Pursuing M-Tech & Com bits
**रक्तगट :** O +ve **उंची :** ५.१
**नोकरी :** पुणे येथे **वा.प्रा. :** २.६४ लाख
**पत्ता : श्री. गणेश अशोक राव,** ताराबाई रोड, कोल्हापूर.
मो. 9511858290, 8208052425
**अपेक्षा :** अनुरूप, शाकाहारी कुटुंब असावे.

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| शांडिल्य | कर्क | आश्लेषा | ४ थे | अंत्य | राक्षस |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - ऑक्टोबर २०२३)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शंतनु B +ve | कऱ्हाडे | २०/४/८५ ५.७ | भारद्वाज, मेष अश्विनी, चौथे आद्य, देवगण | M.Sc. | गोवा येथे नोकरी | वा.प्रा. १२ लाख | श्रीकांत कानेटकर साखळी, गोवा. मो. ९८२३५३११६४ |
| २. | डॉ.ओमकार --- | कऱ्हाडे | २१/१०/८६ ५.६ | नैध्रुव, वृषभ रोहिणी, पहिले अंत्य, मनुष्य | B.D.S. M.D.S. | स्वत:चा व्यवसाय | वा.प्रा. १० ते १२ लाख | विनायक पाध्ये नौपाडा, ठाणे. मो. ९८६९०२०७५९ |
| ३. | प्रसाद A +ve | देशस्थ | २३/७/८४ ५.३ | काश्यप, मेष, कृतिका, पहिले, अंत्य, राक्षस | B.Com. | स्वत:चा व्यवसाय वास्तू विशा. | मा.प्रा. ४०-५० हजार | आशा मधुकर जोशी कसबे डिग्रज, सांगली. मो. ९८२३७६७४२० |
| ४. | आदित्य A +ve | देशस्थ | १५/१०/८८ ५.६ | कौंडिण्य, वृश्चिक अनुराधा, चौथे मध्य, देवगण | M.Com. Computer Course | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा. ३ लाख | स्वाती विद्याधर श्रोत्री कळंबा, कोल्हापूर. मो. ९६८९८६००७८ |
| ५. | अखिलेश B +ve | कोकणस्थ | १/८/८९ ५.४ | वत्स, कर्क पुष्य, चौथे मध्य, देवगण | B.Com. C.S. | मु.पो.मजले कोल्हापूर येथे | वा.प्रा. ३.६० लाख | अश्विनी अरुण जोशी गोडबोले वाडा, गावभाग, सांगली. ९९४५७३९६५२ |
| ६. | ओंकार B +ve | देशस्थ | १/१/९० ५.४ | भारद्वाज, कुंभ धनिष्ठा, तिसरे मध्य, राक्षस | M.Com. | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा. ६ लाख | ओंकार बळवंत पाटील शिवाजी पेठ, कोल्हापूर. मो. ९८५०८४९८९९ |
| ७. | ओंकार AB +ve | देशस्थ | २६/११/९१ ५.६ | भारद्वाज, कर्क अनुराधा, प्रथम मध्य, देवगण | B.B.A. | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा. ३.५ लाख | सायली किरण जोशी पाचगांव, कोल्हापूर. मो. ९५०३८३३२८३ |
| ८. | रोहन A +ve | कोकणस्थ (घटस्फोटीत) | ११/६/९२ ५.११ | शांडिल्य, तूळ स्वाती, तिसरे अंत्य, देवगक्ष | B.Tech. | मुंबई येथे नोकरी | वा.प्रा. ५ लाख ४ हजार | सुनिल हरि दामले शिवाजी पार्क, कोल्हापूर मो. ७५८८२६४२१३ |
| ९. | विनय O +ve | देशस्थ | १०/६/९३ ५.४ | गौतम, कुंभ धनिष्ठा, तिसरे मध्य, राक्षस | B.E. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ५.२५ लाख | वासुदेव रामचंद्र अंबपकर पेठ वडगाव, जि.कोल्हापूर मो. ९७६४८१८१३६ |
| १०. | रोहन A +ve | सारस्वत | १०/४/९४ ५.९ | भारद्वाज, मीन रेवती, दुसरे, अंत्य, देवगण | M.Sc. (Physics) Ph.D. | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा. ३ लाख | संजय गोविंद कामत कळंबा रोड, कोल्हापूर मो. ७७०९५२१४१६ |

### ॲड. अमित राजगोपाल द्रविड (देशस्थ)

**जन्मतारीख :** २८/१२/९२ **उंची :** ५.८ **रक्तगट :** ---

**शिक्षण :** B.S.L., L.L.B., L.L.M., D.C.L. संगीत विशारद सेट (लॉ)

**व्यवसाय :** ॲडव्होकेट उच्च न्यायालय, मुंबई आणि जिल्हा न्यायालय, सातारा, इस्मैल मुल्ला लॉ कॉलेज, सातारा येथे प्रोफेसर म्हणून कार्यरत. **मा.प्रा. :** ---

**पत्ता : श्री. राजगोपाल काशिनाथ द्रविड,** गुरुवार पेठ, द्रविड ऑफिस, सातारा. मोबा. 9822755614, 9405746023 **अपेक्षा :** ---

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| विश्वामित्र | कुंभ | धनिष्ठा | ३ रे | मध्य | राक्षस |

### नारायण मधुसूदन मनोहर (कोकणस्थ) रक्तगट : O +ve

**जन्मतारीख :** ११/४/१९८७ **उंची :** ५.५

**शिक्षण :** B.Com. L.L.B., B.C.A. (Inter)

**नोकरी :** इन्कम टॅक्स व जी.एस.टी. प्रॅक्टिस **वा.प्रा. :** ६ लाख

**पत्ता : श्री. मधुसूदन नारायण मनोहर**

१४४४, सदाशिव पेठ, पुणे.

मोबा. 7083743693, 7743835804

**अपेक्षा :** ---

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भारद्वाज | सिंह | पू.फाल्गुनी | ३ रे | मध्य | मनुष्य |

# कोल्हापूर चित्पावन संघातर्फे मान्यवरांचा सत्कार




शनिवार, दि. ९ सप्टेंबर २०२३ रोजी ब्राह्मण सभा, करवीर, मंगलधाम येथे कोल्हापूर चित्पावन संघातर्फे मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी संघाच्या वाटचालीत सातत्याने मोलाचे सहकार्य करून सिंहाचा वाटा उचलणारे सीए. श्री. विकास परांजपे यांचा सत्कार करताना संघाचे उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे आणि नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांचा सत्कार करताना सौ. पल्लवी देशमुख.

## हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ आणि 'पंचरत्न' वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ब्राह्मण वधूवर विशेषांक प्रसिद्ध होणार

**वधू-वर अंकासाठी विजयादशमीपर्यंत नाव नोंदणी करा ! दिवाळीत विवाह जमवा !!**

हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ आणि महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात व मध्य प्रदेश या राज्यांत अनेक शाखांद्वारे 'लोकप्रिय' असलेले, वधूवर व पालकांच्या विश्वासास पात्र ठरलेले 'पंचरत्न' वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ब्राह्मण वधूवर विशेषांक रविवार, दि. ५ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रकाशित करणार आहोत. या अंकामध्ये ब्राह्मण पोट-शाखेतील देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, सारस्वत, सीकेपी तसेच प्रथमवर, घटस्फोटित, सापत्य, विधवा, विधूर अशा सर्व प्रकारची स्थळे प्रसिद्ध करणार आहोत. या वधू-वर विशेषांकात ज्या ब्राह्मण वधूवरांना आपली माहिती फोटोसह प्रसिद्ध करावयाची आहे. त्यांनी विजयादशमी मंगळवार दि. २४ ऑक्टोबर २०२३ पर्यंत नावनोंदणी करावी. कोल्हापूर चित्पावन संघ, ४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर, फोन नं. ०२३१-२५४६२२५, २९९१६७३, ७६२०५४६२२५ किंवा 'पंचरत्न' च्या पाच राज्यांतील कोणत्याही शाखांमधून प्रत्यक्ष संपर्क साधून आजच आपली नोंदणी करावी. नाव नोंदणी शुल्क रु. ५००/- फक्त. अंकाची किंमत रु. २००/- राहील. (कुरिअर चार्जेस वेगळे)

## श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा कार्यक्रमाचा तपशील

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम येथे श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याचे कार्यक्रम **शनिवार, दि. २१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत** असतील. त्यामध्ये पूजा, श्रींची कहाणी वाचन, आरती, महानैवेद्य, श्रीदेवी मूर्ती प्रतिष्ठापना व दर्शन, मंत्रपठण, घागरी फुंकणे असा नियोजित कार्यक्रम होणार आहे. पूजनासाठी वशेळ्यांनी आगाऊ नोंदणी करावी, ही विनंती.

- स. ९ वा — स्वागत, नोंदणी, पूजासाहित्य वाटप
- स. १० वा. — तुलसीपूजन, श्रींच्या पूजेचा आरंभ
- स. ११ ते १२ — आरती, कहाणी वाचन, महानैवेद्य
- दु. १२ ते २.३० — महाप्रसाद
- सायं. ७ — श्रींची मूर्ती उभी करणे
- पूजा, आरती, मंत्रपठण, नैवेद्य
- सायं. ७.१५ — श्रींचे दर्शन सर्वांसाठी खुले व घागरी फुंकणे, पारंपरिक गीते इ.

या कार्यक्रमासाठी सर्व पोटशाखेतील ज्ञाती बांधवांनी उपस्थित राहून, सेवेचा, महाप्रसादाचा आणि दर्शनाचा लाभ घ्यावा, ही विनंती.

आपले स्नेहांकित,

| केदार जोशी | प्रसाद भिडे | नंदकुमार मराठे |
|---|---|---|
| सचिव | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**लेखकांना आवाहन :** नवस्नेहच्या दीपावली विशेषांकाची तयारी सुरू झाली आहे. लेखकांनी आपले साहित्य कृपया लवकरात लवकर चित्पावन संघ, कार्यालय येथे पोहोचेल असे पाठवून सहकार्य करावे, ही विनंती.

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO

TÜV CERT
DIN EN ISO 9001:2000
CERTIFICATE: 01 100 028964
C-DOT
R.D.S.O.




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.